# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ४१-४४

## दिनांक : १६ जुलै ते ४ ऑगस्ट २०२३

**( विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीतील बैठका )**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| ४१ | १६ जुलै २०२३ | सह्याद्री अथितीगृह (अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला) | ३ |
| ४२ | २१ जुलै २०२३ | विधानभवन, मुंबई | ७ |
| ४३ | २७ जुलै २०२३ | विधानभवन, मुंबई | १० |
| ४४ | ४ ऑगस्ट २०२३ | विधानभवन, मुंबई | ६ |
| | | **एकूण** | **२६** |

# मंत्रिमंडळ निर्णय

# रविवार, दि.१६ जुलै २०२३

सह्याद्री अथितीगृह (अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला)

## ( एकूण निर्णय-३ )

१६ जुलै २०२३

मृद व जलसंधारण विभाग

**सारस्ते लघू पाटबंधारे योजनेस मान्यता**

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सारस्ते लघू पाटबंधारे योजनेच्या सुधारित खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

४१ कोटी ८ लाख ६४ हजार ३०० रुपये इतका सुधारित खर्च या योजनेस येणार आहे. हेदाचा नाल्यावर ही योजना प्रस्तावीत असून योजनेची एकूण पाणी साठवण क्षमता २०१५.७६ स.घ.मि.इतकी आहे. यामुळे १५६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात येईल.

-----o-----

१६ जुलै २०२३

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**नागपूर येथे रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापण्यासाठी अनर्जित रक्कम माफ**

नागपूर येथे रामदेवबाबा स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापण्यासाठी आकारण्यात आलेली १० टक्के अनर्जित रक्कम माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

श्री रामदेवबाबा सार्वजनिक समिती, नागपूर यांनी हे विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. मौजा झिंगाबाई टाकळी येथील जमिनीवर हे विद्यापीठ उभारण्यात येणार आहे.

-----o-----

१६ जुलै २०२३

महसूल विभाग

## शासकीय जमीन शैक्षणिक कारणांसाठी देतांना आकारावयाच्या दरांमध्ये सुधारणा

शासकीय जमीन शैक्षणिक कारणांसाठी देतांना आकारावयाच्या दरांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अध्यक्षस्थानी होते.

पूर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करताना जमिनीच्या प्रचलित बाजार मूल्याच्या २० टक्के दराने, उच्च शिक्षणासाठी ३० टक्के दराने व शासकीय जमीन भाडेपट्टयाने प्रदान करताना सवलतीची कब्जेहक्काची रक्कम विचारात घेऊन, येणाऱ्या रकमेवर शासनाने विहित केलेल्या भाडेपट्टयाच्या दराने जमीन प्रदान करण्यात येईल.

तसेच उच्च शिक्षणासाठी दिलेली शासकीय जमीन पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासाठी देणे, क्रीडांगणासाठी दिलेली जमीन पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी वापरण्यास परवानगी देणे, शैक्षणिक प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेली जमीन कब्जेहक्काने देणे, कब्जेहक्काने दिलेली जमीन भाडेपट्टयाने देणे, शैक्षणिक संस्थेला सवलतीच्या दराने दिलेली जमीन सदर संस्था इतरांशी जमीन/ जमिनीवरील इमारतीचा काही भाग वापराबाबत करार करणे इ.करीता विशिष्ट प्रमाणात अधिमुल्य आकारुन शासन मान्यता देणे, व्यवस्थापनात बदल होताना जिल्हाधिकारी यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक करणे, या बाबीना देखील मान्यता देण्यात आली आहे.

शैक्षणिक प्रयोजनासाठी शैक्षणिक संस्थांनी शासकीय जमिनीवर केलेली दिनांक १ जानेवारी २०१५ रोजी पर्यंतची अतिक्रमणे प्रकरण परत्वे अनुज्ञेय क्षेत्राच्या मर्यादेत नियमानुकूल करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. अतिक्रमित क्षेत्र एक एकर पेक्षा अधिक असल्यास, मात्र मंत्रिमंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील. यापुढे व्यक्ती अथवा संस्था यांना विविध प्रयोजनासाठी ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयाने मंजूर करण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीचे भूईभाडे प्रति ५ वर्षांनी सुधारित करण्यात येईल.

राज्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शैक्षणिक प्रयोजनासाठी शासकीय जमीन वाटपासंदर्भात १ फेब्रुवारी १९७६ चे बाजारमुल्य विचारात घेण्यात येते. याबाबतचे धोरण निश्चित करुन बराच कालावधी लोटलेला असून दरम्यानच्या कालावधीमध्ये जमिनींच्या किंमतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

-----o-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि.२१ जुलै २०२३ - विधानभवन
# ( एकूण निर्णय- ७)

२१ जुलै २०२३

इतर मागास बहुजन कल्याण विभाग

## विविध समाजांसाठी ४ उपकंपन्या

राज्यातील विविध समाजांसाठी ४ उपकंपन्या स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, वीरशैव लिंगायत समाजासाठी जगदज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत रामोशी समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ या उपकंपन्या स्थापन करण्यात येतील.

या सर्व उपकंपन्यांचे मुख्यालय मुंबई येथे राहील तसेच त्यांच्या कामकाजाकरिता प्रत्येकी १५ पदे मंजूर करण्यात आली आहेत. या उपकंपन्यांचे जिल्ह्यातील कामकाज या दोन्ही महामंडळाच्या ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांमार्फत पाहण्यात येईल.

या ४ उपकंपन्यांना प्रत्येकी अधिकृत भाग भांडवल ५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून दरवर्षी या चारही उपकंपनीस विविध योजना राबवण्यासाठी ५ कोटी रुपये भागभांडवल मंजूर करण्यात आले आहे.

-----o-----

२१ जुलै २०२३

विधि व न्याय विभाग

## मुंबई नगर दिवाणी न्यायालयाच्या अधिकारात वाढ

मुंबई नगर दिवाणी न्यायालयाच्या सध्याच्या १ कोटी रुपयांच्या आर्थिक अधिकारितेमध्ये वाढ करुन १० कोटी रुपये करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

याअनुषंगाने मुंबई नगर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा करण्यास व विधि विधानाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करुन चालु हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्यास अनुमती देण्यात आली.

-----o-----

२१ जुलै २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**परदेशातील उच्च शिक्षणासाठी**

**शिष्यवृत्तीधारकांच्या संख्येत वाढ**

खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अधिक मुलांना देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. यामुळे आता २० ऐवजी ४० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल.

सध्याच्या शासन निर्णयान्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांकरिता जाहीर करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती धोरणाचे निकष आहे तेच कायम ठेऊन तसेच ६ सप्टेंबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये उत्पन्न मर्यादेनुसार शिष्यवृत्ती लाभार्थ्यांची विद्यार्थीसंख्या ही २० वरुन ४० एवढी करण्यात येईल. याकरिता ९ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

-----०-----

२१ जुलै २०२३

इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**मोदी आवास योजनेत १० लाख घरे बांधणार**

मागास प्रवर्गातील लाभार्थीसाठी मोदी आवास घरकुल योजना राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या योजनेंतर्गत येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधण्यासाठी १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील.

ही योजना प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येईल. या योजनेत आवश्यक निधीची तरतूद इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत उपलब्ध करण्यात येईल. या योजनेची अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वय ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण या यंत्रणेमार्फत करण्यात येईल. या योजनेंतर्गत ४ टक्के इतकी रक्कम प्रशासकीय निधी म्हणून राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास देण्यात येईल.

मोदी आवास घरकुल योजनेतंर्गत इतर मागास प्रवर्गातील ज्या पात्र लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकामाकरीता स्वतःची जागा उपलब्ध नाही, असे या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, याकरीता सदर लाभार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेंतर्गत ५०० चौ. फुट जागेपर्यंत ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. आणि इतर मागास प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य प्रवर्गातील पात्र लाभार्थी पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत तरतुदीनुसार लाभ मिळण्यास पात्र असेल.

-----०-----

२१ जुलै २०२३

सार्वजनिक आरोग्य विभाग

## जनेरिक औषधी दुकाने सुरु करण्यास मान्यता

राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेस जनेरिक औषधी दुकाने सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सार्वजनिक आरोग्य विभागांच्या २४१८ आरोग्य संस्था व शासकीय रुग्णालयांमध्ये (उपकेंद्रे वगळून) ही औषधी दुकाने सुरु करण्यात येतील. या दुकानांकरिता आरोग्य संस्थेत सुमारे २०० ते २५० चौरस फुट इतकी जागा प्रथमतः २० वर्षाकरीता भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

-----०-----

२१ जुलै २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## राज्यात व्हर्टिकल युनिव्हर्सिटी कॅम्पस् उभारणार

आवश्यक जमीन उपलब्ध नसल्यामुळे मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे या शहरांमध्ये व्हर्टिकल युनिव्हर्सिटी कॅम्पस् उभारण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

न्यूयॉर्क, वॉशिंग्टन व तेलअविव या शहरांमध्ये अशा पद्धतीने जमीन उपलब्ध नसल्याने उंच इमारतींमध्ये विद्यापीठे आहेत. या संदर्भात नेमलेल्या बोंगिरवार समितीने अशी शिफारस केली होती. त्यानुसार स्वयंम अर्थसहाय्यीत विद्यापीठांचे व्हर्टिकल युनिव्हर्सिटी कॅम्पस् उभारण्यात येतील. त्यासाठी विविध निकष देखील निश्चित करण्यात आले आहेत. यासाठी किमान १५ हजार चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम असणारी इमारत आवश्यक आहे. शिवाय जवळच्या परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या वसतीगृहाची सोय असणे देखील गरजेचे आहे.

-----०-----

२१ जुलै २०२३

सार्वजनिक आरोग्य विभाग

**आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद सेवेसाठी**
**पुरवठादाराची नेमणूक**

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद सेवा (टोल फ्री क्रमांक १०८) प्रकल्पाकरीता सेवा पुरवठादाराची १० वर्षा करीता पीपीपी तत्वावर नेमणूक करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी ७५९ कोटी ५६ लाख रुपये इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली. तसेच निविदा प्रक्रिया निविदा समितीमार्फत राबविण्यास देखील बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय

## दि. २७ जुलै २०२३ - विधानभवन

## ( एकूण निर्णय-१० )

२७ जुलै २०२३
उद्योग विभाग

**भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयात**
**महासंचालक पद**

भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयात सचिव दर्जाचे महासंचालक पद निर्माण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

सध्या राज्यसेवेतील संचालक (तांत्रिक) हे **राज्यस्तरीय** विभागीय प्रमुख पद आहे. भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या अखत्यारित प्रामुख्याने प्रमुख खनिजांचे कामकाज हाताळले जाते, ज्यामध्ये लोह खनिज, मॅगनिज ओर, बॉक्साइट, लाइमस्टोन इत्यादी खनिजांचा समावेश होतो. या संचालनालयाकडून सद्यस्थितीत राज्यातील प्रमुख खनिजांचे पुर्वेक्षण, खाणपट्टे निश्चित करणे, ई-लिलाव प्रक्रिया पार पाडणे व त्यातून खाण पट्ट्यांचे वाटप करणे इत्यादी कामे करण्यात येतात.

राज्यामध्ये विपूल प्रमाणात खनिज संपदा आहे, ज्यामधून राज्याला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होतो तसेच खनिजावर आधारित उद्योगधंदे निर्माण करणे आणि त्यातून रोजगार निर्मिती करण्यास मोठा वाव आहे. राज्याच्या दृष्टीने खनिज क्षेत्रात उपलब्ध असलेल्या या संधीचा लाभ घेण्यासाठी खनिकर्म क्षेत्राचे प्रभावी व्यवस्थापन व संनियंत्रण करण्यासाठी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर येथे वरिष्ठ दर्जाचे पद निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर येथे सचिव दर्जाचे **"महासंचालक"** हे नवीन पद निर्माण करण्यात येईल.

------0-----

२७ जुलै २०२३

उद्योग विभाग

## महासंचालक हायड्रोकार्बन्स पद निर्माण करणार

उद्योग विभागांतर्गत महासंचालक, हायड्रोकार्बन्स हे सचिव दर्जाचे पद निर्माण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्याला हायड्रोकार्बन्स क्षेत्रात तसेच जैवइंधन क्षेत्रात पुढील वाटचाल करण्याकरीता गुंतवणूक वाढीसंदर्भात सल्ला देणे, हायड्रोकार्बन्स साठ्यांचे अन्वेषण (Exploration) करणे, पुनर्मूल्यांकन (Reassess) करणे, राज्यातील अन्वेषण कार्यक्रमांचा आढावा घेणे, या साठ्यांच्या सुयोग्य व्यवस्थापन प्रणाली अवलंबविण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे तसेच या क्षेत्राशी निगडीत इतर बाबींसदर्भात राज्य शासनाला सल्ला देण्याकरीता तसेच राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्राधान्य क्षेत्रात सुलभता आणण्याकरीता महासंचालक हे पद निर्माण करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे राज्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये इंधन वायूचे (Fuel Gas) जाळे पसरविणे, राज्यातील संपीडित जैविक वायू (CBG-Compressed Biogas) उत्पादक प्रकल्पांना चालना देऊन राज्यातील CBG उत्पादन वाढविणे तसेच राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये स्थापित फ्युएल हब तसेच राज्यातील नैसर्गिक वायू, पेट्रोलियम हायड्रोकार्बन्स, नॅप्था, हायड्रोकार्बन्स पासून निर्मिती झालेले सर्व रासायनिक उत्पादके, विशेष प्रकारचे पेट्रोलियम व पेट्रोलियम पदार्थ, सर्व प्रकारचे प्लॅस्टिक्स, सिंथेटिक फायबर्स, CBG (Compressed Biogas), CNG (Compressed Natural Gas), LNG (Liquefied Natural Gas), PNG (Piped Natural Gas), LPG (Liquefied Petrol Gas), CGD (City Gas Distribution), हायड्रोजन गॅस इत्यादी क्षेत्रामध्ये विविध ऑपरेशन्स राबवून विकास करण्याकरीता राज्यात चालना मिळणार आहे.

महासंचालक, हायड्रोकार्बन्स हे पद हायड्रोकार्बन्स क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींमधून अथवा सेवेतील भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी अथवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांच्यामधून भरण्यात येणार आहे. या पदासाठी अंतिम वयोमर्यादा ६५ इतकी राहणार आहे.

-----o-----

२७ जुलै २०२३

कृषि विभाग

## कृषि सेवकांच्या निश्चित वेतनात भरघोस वाढ

कृषि आयुक्तालयांतर्गत कृषी सेवकांच्या निश्चित वेतनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

कृषि आयुक्तालयांतर्गत कृषी सहायकांची पदे सुरूवातीस कृषि सेवक म्हणून २५०० रुपये या निश्चित वेतनावर भरण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर १ एप्रिल २०१२ पासून कृषि सेवकांच्या निश्चित वेतनामध्ये २५०० रुपयांवरून ६००० रुपये एवढी वाढ करण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटनेकडून केलेल्या मागणीनुसार कृषि सेवकांच्या निश्चित वेतनामध्ये १६००० रुपये एवढी वाढ करण्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

२७ जुलै २०२३

गृहनिर्माण विभाग

## पुनर्वसित सदनिकेच्या हस्तांतरण शुल्कात कपात

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसित सदनिका, गाळ्याच्या हस्तांतरण शुल्कात कपात करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

विहित कालावधीनंतर सदनिका किंवा गाळेधारक त्यांच्या जवळच्या नात्यात म्हणजेच पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नात, नातू, विधवा सून यांना बक्षिस पत्राद्वारे हस्तांतरण करतानाचे शुल्क २०० रुपये घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. पूर्वी निवासी सदनिकांसाठी हे शुल्क १ लाख रुपये आकारले जात होते.

-----०-----

२७ जुलै २०२३

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## राष्ट्रीय विधि विद्यापीठांना निधी उपलब्ध

मुंबई,नागपूर आणि औरंगाबाद येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठांना प्रत्येकी ५ कोटी इतका निधी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हा निधी २०२३-२४ ते २०२७-२८ या कालावधीसाठी दरवर्षी देण्यात येईल.

-----०-----

२७ जुलै २०२३

नगर विकास विभाग

## तंत्रज्ञान केंद्रासाठी सिंधुदूर्गनगरी येथील जागा

सिंधुदूर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरणाची ८ हेक्टर जागा तंत्रज्ञान केंद्रासाठी विनामोबदला देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

भारत सरकारच्या सुक्ष्म लघु व मध्यम मंत्रालय (एमएसएमई) यांनी विनंती केल्यावरुन ही जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे राज्यातील तरुणांची तांत्रिक कौशल्य वाढवून कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यास फायदा होणार आहे.

-----०-----

२७ जुलै २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## विधि विद्यापीठाचे वार्षिक लेखे विधानमंडळात मांडणार

राष्ट्रीय विधि विद्यापीठाचे वार्षिक लेखे विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

कलम ३५ (३) लेखापरिक्षा केलेले लेखे कार्यकारी परिषदेकडून प्रसिद्ध करण्यात येतील त्याची एक प्रत महापरिषदेसमोर ठेवण्यात येईल. तसेच वित्तीय वर्ष संपल्यानंतर एक वर्षाच्या आत विधि विद्यापीठे वार्षिक लेखे लेखापरिक्षकाच्या अहवालासह राज्य शासनास सादर करेल. राज्य शासन हे लेखे विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर मांडेल.

-----०-----

२७ जुलै २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## सोलापूर, पुणे येथे स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे

सोलापूर, पुणे येथे स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूर आणि डीईएस पुणे विद्यापीठ, पुणे अशी ही २ विद्यापीठे असतील. दोन्ही विद्यापीठे २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात येतील.

-----०-----

२७ जुलै २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**लक्ष्मी नारायण अभिनय तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक**

लक्ष्मी नारायण अभिनय तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ विधेयक-२०२३ च्या प्रारुपास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठापासून विभक्त करून विद्यापीठामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात येईल. यासाठी १ कोटी ८१ लाख इतक्या वार्षिक खर्चास मान्यता देण्यात येईल. तसेच विविध इमारतींच्या बांधकामासाठी २५० कोटी खर्च विभागाकडून भागविण्यात येईल.

-----०-----

२७ जुलै २०२३

बंदरे विभाग

**राज्याचे बंदर विकास धोरण**

राज्याच्या सर्वंकष अशा बंदर विकास धोरण-२०२३ ला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

हे धोरण ५ वर्षांच्या कालावधीसाठी असेल. बंदरे आणि जेटीसाठी एकत्रित धोरण असून यामध्ये एकसमानता निर्माण करण्यासाठी वॉटर फ्रंट रॉयल्टी असा उल्लेख करण्यात आला आहे. याशिवाय बंदर प्रकल्पांचे मायक्रो, लहान, मध्यम, मोठे आणि विशाल असे वर्गीकरण्यात करण्यात आले आहे. यामध्ये १० कोटी ते ३ हजार कोटी इतकी गुंतवणूक तसेच १ मिलियन टन ते १०० मिलियन टन इतक्या माल हाताळण्याची क्षमता विचारात घेण्यात आली आहे. याशिवाय बंदरांना रस्ते व रेल्वे जोडणी किनारी मनोरंजन, शिपयार्ड, मरिना, जहाज पुर्नवापर सुविधा या गोष्टींचा देखील समावेश या धोरणात आहे. बंदरांवर आधारित औद्योगिक विकासासाठी यात तरतुदी असून कौशल्य विकासद्वारे कुशल मनुष्यबळ देखील सागरी क्षेत्रात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मच्छिमारांना नुकसान भरपाई देणे, सागरी प्रकल्पांसाठी सवलती देणे, मालमत्ता मुद्रीकरण अशा बाबींचा देखील यात समावेश आहे.

-----०-----

# मंत्रिमंडळ निर्णय
# दि. ३ ऑगस्ट २०२३ – विधानभवन
# ( एकूण निर्णय-६ )

३ ऑगस्ट २०२३
गृह विभाग

## कारागृह विभागात विविध संवर्गात २ हजार पदे निर्माण करणार

राज्यातील विविध कारागृहांमध्ये २ हजार पदे निर्माण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात एकूण ६० कारागृहे आहेत. सद्यस्थितीत कारागृह विभागासाठी ५०६८ पदांचा आकृतीबंध मंजूर आहे. कारागृहातील अधिकृत बंदीक्षमात २५,३९३ असून माहे जून, २०२३ अखेर ४१,५१४ इतके बंदी बंदीस्त आहेत. कारागृहातील आजची सरासरी बंदी संख्या टक्केवारी नुसार १६३ टक्के इतकी आहे. कारागृहातील बंद्याचे असणारे प्रमाण व प्रत्यक्ष बंद्यांची देखरेख, निगराणी व त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने कार्यकारी संवर्गात फक्त ४१९४ पदे मंजूर आहेत. बंद्यांची प्रत्यक्ष संख्या व कार्यकारी संवर्गातील एकूण मंजूर पदांच्या संख्येपेक्षा सुमारे ८ पटीने अधिक आहे. त्यामुळे बंद्यांवर निगराणी ठेवणे कारागृह प्रशासनास जिकरीचे ठरत आहे.

यास्तव, कारागृहांची सुरक्षितता व त्या अनुषंगाने नवीन पदे निर्माण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. कारागृह विभागाच्या मध्य विभाग, औरंगाबाद या प्रादेशिक कार्यालयाचे विभागजन करून नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह, धुळे, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, अहमदनगर ही जिल्हा कारागृहे, विसापुर खुले जिल्हा कारागृह व किशोर सुधारालय, नाशिक या संस्थांच्या समावेशासह नाशिक येथे नवीन प्रादेशिक कार्यालय निर्माण करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली

कारागृह विभागातील उक्त नवीन २००० पदांपैकी विशेष कारागृह महानिरीक्षक हे पद अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे मंजूर करण्यास व सद्यस्थितीत मंजूर असलेले कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) हे पद नाशिक येथे प्रस्तावित असलेल्या स्वतंत्र प्रादेशिक कार्यालयासाठी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

३ ऑगस्ट २०२३

सार्वजनिक आरोग्य विभाग

**सार्वजनिक आरोग्य विभागाच्या**
**शासकीय रुग्णालयांमधील तपासणी, उपचार नि:शुल्क**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासकीय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार नि:शुल्क करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावरील (राष्ट्रीय रक्त धोरणानुसार रक्त व रक्त घटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणारे सेवाशुल्क वगळून) ही तपासणी व उपचार नि:शुल्क करण्यात येईल.

या निर्णयामुळे समाजातील तळागाळातील गरजू रुग्णांना नि:शुल्क वैद्यकीय सेवा देणे शक्य होईल. सध्या आरोग्य विभागाच्या ५१२ आरोग्य संस्था आणि १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वर्षाला सुमारे ७१ कोटी रुपये निधी रुग्णालयीन शुल्कापोटी जमा होतो.

-----०-----

३ ऑगस्ट २०२३

कामगार विभाग

**माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळाच्या**
**कामकाजात सुसूत्रता आणणार**

माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी संबंधित अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

विविध आस्थापना, कामगार संघटना यांनी या संदर्भामध्ये मागणी केली होती. तसेच काही तरतुदी बदलत्या काळानुसार सुधारित करणे अत्यंत गरजेचे झाले होते. यामुळे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम,१९६९ आणि महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

-----०-----

३ ऑगस्ट २०२३

ऊर्जा विभाग

**शेतकऱ्यांना वीज दरातील सवलत योजनेस मुदतवाढ**

अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन योजनांचे ग्राहक असलेल्या शेतकऱ्यांना वीज दरातील सवलत योजनेस मुदतवाढ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या ग्राहकांना ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल. या ग्राहकांनी भरावयाच्या सवलतीचा दर १ रुपया १६ पैसे प्रति युनिट व स्थीर आकार २५ रुपये प्रति केव्हीए प्रति महिना इतकी सवलत कायम ठेवण्यात येईल. लघुदाब योजनांमध्ये ग्राहकांना १ रुपया प्रति युनिट सवलत व स्थीर आकारामध्ये १५ रुपये प्रति महिना इतकी सवलत देण्यात येईल.

या सवलतीमुळे महावितरण कंपनीस ६७० कोटी रुपये तूट येणार असून शासनातर्फे अनुदान देण्यास देखील मान्यता देण्यात आली.

-----०-----

३ ऑगस्ट २०२३

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**पुणे येथे स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठ**

पुणे येथे स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठ सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

अलार्ड विद्यापीठ, पुणे हे २०२३-२४ शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात येईल.

-----०-----

३ ऑगस्ट २०२३

जलसंपदा विभाग

**पाटोदा साठवण तलावास सुधारित मान्यता**

जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील पाटोदा साठवण तलावाच्या १३० कोटी ६६ लाख इतक्या खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

रामतीर्थ नदीवर असलेल्या या धरणाची एकूण साठवण क्षमता ८.६० दलघमी असून यामुळे १ हजार १९९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

-----०-----